# आनंदमहल

लेखक : नारायण धारप

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**आनंदमहल : नारायण धारप**

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.:९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये २३०/-

# एक ....

बऱ्याच वेळात बाहेरच्या खोलीतून अमरच्या हालचालीचा काहीच आवाज आला नाही, म्हणून वंदनाने स्वैपाकघराच्या दारातून बाहेरच्या खोलीत डोकावून पाहिलं. स्वत:च्या सर्व गाड्या स्वत:भोवती मांडून अमर मध्ये बसला होता. नुसताच बसला होता. खोलीच्या खिडकीकडे पाहात होता. तसा अमर धडपड्या, धावपळ करणारा कधीच नव्हता. जरासा शांत, जरासा अबोल. पण काही काही वेळा (आताची वेळ त्यातलीच एक होती) तर तो अगदीच शांत बसायचा – अधांतरी कोठेतरी ध्यान लावून बसल्यासारखा. अशा वेळी ती त्याला हाक मारीत नसे किंवा जवळ जाऊन हलवतही नसे – त्याचा वाईट (जवळजवळ भयानकच!) परिणाम तिने एकदाच अनुभवला होता. तिचा स्पर्श होताच तो केवढ्यांदा तरी दचकला होता. ''काय ? काय ? काय ?'' असं ओरडला होता. तेव्हापासून तिने ते सोडलं होतं. हा प्रकार जरासा विलक्षण वाटला तरी धोक्याचा वाटत नव्हता. एक उसासा सोडून ती माघारी वळली. नाहीतरी त्याने एकट्याने वेळ कसा घालवायचा ? मन कशात रमवायचं ? आता तो सात वर्षांचा व्हायला आला होता. पण धावपळीच्या संसारात कोठे एका गावात–शहरात मूळ धरायला, बस्तान बसवायला, चार ओळखी व्हायला फुरसतच मिळत नव्हती.

आणि राहायच्या जागा या अशा.... चाळीतल्या दोन खोल्या, नाहीतर एखाद्या बंगल्याचं गॅरेज, नाहीतर आऊटहाऊस... तेही कोणाच्या तरी मेहेरबानीने मिळालेलं – सदानंदच्या एखाद्या श्रीमंत मित्राने शब्द टाकलेला असायचा, म्हणून मिळालेलं.

सदानंदचे मित्र श्रीमंत होते, यशस्वी होते, समाजातल्या उच्च वर्गात वावरत

होते. सदानंदही त्यांच्यापैकी एक झाला असता – जर त्याला ही दारूची सवय नसती तर ! त्या दारूने त्याचा, त्याच्या करिअरचा, त्याच्या भविष्याचा, त्याच्या संसाराचा आणि त्याच्या एकुलत्या एक मुलाच्याही भवितव्याचा सर्वनाश केला होता. दारूच्या नशेचा अनेकांच्यावर अनेक प्रकारचा परिणाम होतो – काहीजण असंबद्ध होतात, काहीजण गुंगीत जातात, तर काहीजण भांडखोर होतात. दुर्दैवाने सदानंद शेवटच्या वर्गातला होता. दोन–चार पेग जास्त झाले की आपण कोठे आहोत, कोणाशी बोलत आहोत हे तो पार विसरून जात असे. वरिष्ठांचा, हितचिंतकांचा उपमर्द, अपमान आणि तोही चारचौघात झाल्यावर त्याचं कटु पर्यवसान – नोकरीतून हकालपट्टी – हे अपरिहार्यच असणार ! मागाहून पश्चात्ताप काय कामाचा ? अगदी प्रांजल पश्चात्ताप झाला तरी त्याचा काय उपयोग ? व्हायचं ते होऊन गेलेलं असायचं.

मग परत नोकरीसाठी धावाधाव. मग परत भ्रमंती. आसपासच्यांशी जरा कोठे मैत्रीचे संबंध स्थापन होतात न होतात तोच हा आघात ! शरमेने मान खाली घालून शेवटचे काही दिवस वावरायचं... की त्या वस्तीला, किंवा गावाला किंवा शहराला रामराम !

ती एकटी असताना – आणि आताआताशी कितीतरी वेळा ती अशी एकटीच असायची – सतत मनात विचार यायचा – याच अंधाऱ्या, ओसाड, खडतर, एकाकी मार्गावरून आपलं यापुढचं आयुष्य जाणार का ? सुरुवातीची तिची आयुष्याबद्दलची स्वप्नं कदाचित भाबडीही असतील – पण आयुष्याकडून स्वास्थ्य, निश्चिंतता, आर्थिक सुबत्ता, सामाजिक प्रतिष्ठा या किमान अपेक्षा तरी बाळगण्याचा हक्क तिला नव्हता का ? आणि व्याजोक्तीच अशी होती की, हे सर्व सहज शक्य झालं असतं ! सदानंद खरोखरच गुणी होता, हरहुन्नरी होता, कष्टाळू होता. तो कोणत्याही व्यवसायात खासच वरच्या हुद्द्यापर्यंत सहज चढला असता – जर हा दारूचा शाप नसता तर !

गेली बारा वर्ष ती त्याला साथ देत आली होती – त्याच्यात कधी ना कधी सुधारणा होण्याच्या आशेवर ! कितीदा त्याने दारू सोडण्यासाठी वचनं दिली होती – आणि कितीदा मोडली होती ! खरी गोष्ट ही होती की, तीच स्वत:ला फसवत आली होती. एक अप्रिय पण कठीण निर्णय घ्यायची वेळ आली होती – तो ती

लांबणीवर टाकण्याची खटपट करीत होती. तिची पस्तिशीही उलटली नव्हती. मनात आणि शरीरात काहीतरी उभारी होती तोवरच तिला तो निर्णय घ्यायला हवा होता. अमरला घेऊन वेगळं राहण्याचा निर्णय. काहीतरी नोकरी धरण्याचा निर्णय... पण ते अलग होऊन. सदानंदबरोबर राहून नाही. एकदा का तिने संसारासाठी द्रव्यार्जन करण्याची जबाबदारी स्वीकारली की सदानंदवरचं शेवटचं मानसिक बंधनही गळून पडेल. मग तर ती त्या कर्दमात कायमचीच रुतून बसेल.

असा हा निर्णय घेताना भावनांच्या पाशांनी मन जखडू देता उपयोगी नाही.

भावनांचे पाश असणारच ! त्यांच्या बारा वर्षांच्या वैवाहिक आयुष्यात सुखाचे, उन्मादाचे, कायमचे जतन करून ठेवावेत असे क्षण आलेच नव्हते का ? अर्थात् आले होते – पण अत्तराच्या वासासारखे ते उडून गेले होते... मागे एक हुरहुरीची स्मृती ठेवून. त्या आठवणी हलक्याफुलक्या होत्या. कठीण, व्यवहारी आयुष्याचा भार पेलायची त्यांच्यात शक्ती नव्हती.

आपले निर्वाणीचे शब्द ऐकताच सदानंदचा चेहरा कसा होईल ? आपल्यावर त्याचा जीव आहे याबद्दल तिच्या मनात कधीही शंका नव्हती... पण त्या प्रेमासाठी ती किती सहन करणात होती ? किती झीज सोसणार होती ? किती त्याग करणार होती ?

वर्षं उलटत चालली होती तसे सुखाचे क्षण दुर्मीळ व्हायला लागले होते. त्यांची ओळख पटेनाशी झाली होती – समोर आले तरी त्याच्यावर मनाचा विश्वास बसत नव्हता... कारण अनेकदा ती मृगजळंच ठरली होती – आणि त्यानंतर येणारी निराशा तर जास्तच दारुण, जास्तच असह्य भासली होती...

नाही... मनाला फसवायची वेळ गेली होती...

आता सदानंद परत येईल तेव्हा ही त्याची–तिची शेवटचीच भेट असेल....

---------

अमर गाड्यांच्या पसाऱ्यात बसला होता. पूर्वी ही मॉडेल्स परदेशातूनच आणावी लागत – तेव्हा ते स्टेटस् सिंबॉल होते. आता भारतात निर्मिती व्हायला लागल्यापासून त्यांची किंमत कमी झाली होती – मग सदानंदच्या श्रीमंत मित्रांनी आपल्या मुलांसाठी आणलेल्या या लहान गाड्या अमरला खेळायला दिल्या होत्या. जीप, डंपर, स्टेशनवॅगन, टॅक्सी, टँकर, लॉरी – सर्व प्रकारच्या गाड्या. अशाच

आणखी जुन्या खेळण्यांनी त्याचं कपाट भरलं होतं. तुकडे गहाळ झालेली जिगसॉ. विटा गहाळ झालेली लेगो. त्याला ती खेळणी आवडत नव्हती असं नाही – पण बरोबर कोणीतरी खेळायला मिळालं तर मजा वाढत होती... तसं कोणीच नव्हतं... किंवा...

त्याला मित्र तरी कसं म्हणायचं ? जो कधी बोलत नाही, जो कधी जवळ येत नाही, ज्याचा चेहरा नेहमी सावलीतच असतो (दिसतात ते फक्त दोन मोठमोठे डोळे)...अमरने एकदाच त्याच्या जवळ जायचा प्रयत्न केला होता – आणि तो एकाएकी नाहीसा झाला होता... असला कसला मित्र ?

(अमरला तो जन्माच्या क्षणापासून दिसत होता... सुरुवातीच्या दिवसांत अर्थात् आकारांना अर्थच नव्हता... मग ते स्वत:च्याच शरीराचे भाग वाटायला लागले... दुसऱ्या–तिसऱ्या महिन्यात कधीतरी त्याला कळलं की ते बाहेर आहेत, ते हातांनी धरता येतात – तेव्हाही हा आकार दूरच राहिला... पण तेव्हा त्याला अंतराची, खऱ्या–खोट्याची जाण नव्हती... खिडकीतून दिसणारं झाड, लांबवरचा आकाशातला ढग, आरशातला चेहरा, सर्वकाही तो एकाच मापाने मोजत होता... अमरला हेही माहीत नव्हतं की, बाबांना चांगली नोकरी असली, घरात सर्वकाही व्यवस्थित असलं, वातावरण छान असलं की मित्र दिसत नसे... त्याला माहीत नव्हतं, हा मित्र संकटकाळचा पाहुणा होता; बाबांची नोकरी गेली, आई–बाबांची वादावादी सुरू झाली, गल्ली–गाव–शहर सोडायची वेळ आली, आईच्या डोळ्यात पाणी आलं, आणि बाबांच्या कपाळावर आठ्या आणि डोळ्यात ती (भीतीदायक) लाली आली, घरातला ताण कडक उन्हासारखा (किंवा विझलेल्या स्टोव्हच्या वासासारखा) जाणवायला लागला की, त्याचा मित्र हजर व्हायचा.)

अमरला एकाकीपणा इतका जाणवत होता की, या क्षणी त्याने कोणाचीही संगत पसंत केली असती. ठीक आहे – नसला बोलत तर न बोलू दे. नुसता हजर असला तरी चांगलंच की ! त्याने गाड्या हलवल्या, डंपर मागे घेतला, टॅक्सी पुढे घातली... मग समोर पाहिलं...

(तेव्हा काय झालं ते त्याला कधीच कळलं नाही.)

त्याचा मित्र जवळ येत होता किंवा मोठा होत होता. पण तरीही नीट दिसत नव्हता. खरं तर तो तिथे नव्हताच. खोलीच्या भिंतीवरच कोणीतरी काळ्या रंगातली

मुलाची आकृती काढल्यासारखी वाटत होती – पण चित्र असं मोठं कसं होईल? आणि चित्रातून असा प्रकाश कसा दिसेल ?

नाही... ते चित्र नव्हतंच... वर्तमानपत्रातली आकृती कापून घेतली की, मागे रिकामी जागा राहते तशी ती रिकामी जागा होती... जणू काही कोणीतरी भिंतीतलाच तुकडा कापून घेतला होता... पण भिंतीतून दिसत होता तो बाहेरचा रस्ता नव्हताच...

तो एक खूप जुना वाडा होता. वाडा जवळजवळ येत होता... (एकदा त्याने सिनेमात असा बंगला जवळ जवळ येताना पाहिला होता.) आता विटांमधल्या रेघा दिसत होत्या. आता खिडक्या जवळ येत होत्या. एक खिडकी. तिसऱ्या मजल्यावरची एक खिडकी. खिडकी बंद होती. पण असं वाटत होतं, त्या खिडकीमागे कोणीतरी आहे. खिडकीच्या फटीला डोळा लावून बसलं आहे... बाहेर पाहात आहे. आता एवढ्यातच दाण्‌दिशी खिडकीचं दार उघडणार आहे...

अशी भीती अमरला आजवर कधीही वाटली नव्हती.

''नको ! '' तो ओरडला... खूप मोठ्याने ओरडला.

''अमर ! '' वंदना आतून ओरडली आणि घाईघाईने बाहेर आली.

अमर समोरच्या भिंतीकडे वटारलेल्या डोळ्यांनी पाहात होता. वंदनाने त्याला एकदम जवळ घेतला. त्याचं शरीर लाकडासारखं ताठ झालं होतं. याला काही फिट् बिट् तर नाही ना आली ? तिच्या मनात भयानक शंका आली – आता हेच तेवढं कमी होतं ! माझा एकुलता एक लाडका मुलगा अमर... पण तेवढ्यात त्याचं शरीर सैल पडलं... आणि तो मुसमुसून रडायला लागला... खांद्यावर, डोक्यावर, पाठीवर हलके हलके थोपटून वंदनाने त्याला कसातरी शांत केला.

''आता मी आहे ना ? आता भ्यायचं नाही ! आता मी आहे ना जवळ ? आता कशाला रडायचं ? मी आहे हं–'' ती त्याला धीर देत होती. (तिचं स्वत:चं मन आतल्या आत भीतीने थरथरत होतं.)

हळूहळू त्याचे हुंदके थांबले. मग दोन–तीन खूप मोठे थरथरते श्‍वास सोडून तो उठून बसला.

''मला–मला भीती वाटली गं आई !''

''पण कशाची, राजा ? खोलीत तर तू एकटाच आहेस की ! पाहा !''

''अगं, मी खोलीत नव्हतो – म्हणजे ही भिंत आहे ना, त्या भिंतीला एक

मोठं  भोक पडलं होतं... आणि त्यातून काय दिसत होतं माहीत आहे का ? आपला रस्ता नाही काही ! एक खूप मोठा वाडा ! खूप खिडक्यांचा ! बंद खिडक्यांचा ! आणि... आणि...''

अमरचा आवाज थांबला. त्या बंद खिडकीची का भीती वाटली होती ते त्याला सांगताच येईना. आणि त्याला ती आठवणच नको होती.

''चलतोस का आता ? तुला चहा-खारी देऊ का ? चल !'' वंदना म्हणाली आणि त्याला घेऊन आतल्या खोलीत आली. हा काय आणखी नवा प्रकार होता? तिच्या डोक्याला काळज्या काय कमी होत्या की काय, की त्यात ही आणखी नवी भर पडायला ? दैव तरी परीक्षा पाहणार होतं तरी किती ? खारी चहात बुडवता बुडवता अमरने वर तिच्याकडे पाहिलं - किती निरागस, किती भाबडा चेहरा ! तिला आतून अगदी भडभडून आलं... पण स्वत:वर ताबा ठेवायला हवा होता. अमरला हसरा चेहरा दाखवायला हवा होता. त्याच्याशी साध्यासुध्या, गमतीच्या गप्पाच मारायला हव्या होत्या... आणि हे तर आणखीच कठीण जाणार होतं.

✦✦✦

# दोन ....

फिरोझला सदानंदने पत्र पाठवलं होतं. निरुपाय झाल्यावर. सर्व स्वाभिमान गिळून. इतर सर्व वाटा बंद झाल्यावर. वंदनाची आपल्यावर खिळलेली प्रश्नार्थक नजर त्याला जाणवायला लागली होती. तिच्या मनात काय विचार चालले आहेत याची त्याला पूर्ण कल्पना होती. आणि तिला तरी दोष कशासाठी द्यायचा ? तिने तरी सहन किती करायचं ? आपल्या आयुष्याचं आपणच आपल्या हातांनी केलेलं मातेरं त्याला दिसत नव्हतं का ? तिच्याही सहनशक्तीला शेवटी काही मर्यादा असणारच की नाही ? ती काय वेदपुराणातली पतिव्रता थोडीच होती की, तिने पतीबरोबर कष्टाचा वनवास स्वीकारावा ? (त्याचं मन त्याला टोचून म्हणालं – हे खरं नाही ! तिला संपत्तीचा, ऐश्वर्याचा, मानमरातबाचा मोह नाही ! तिला साधा पण सुखी संसार हवा आहे ! तेच तू तिला देऊ शकत नाहीस !)

गोष्टी या थराला आल्या... जेव्हा स्वाभिमान आणि वंदना यांच्यातच निवड करण्याचा क्षण येऊन ठेपला तेव्हा त्याने फिरोझला पत्र लिहिलं होतं.

फिरोझ – त्याचा जुना दोस्त. सदानंद अकौन्टन्सीमधे गेला, फिरोझ ॲडव्हर्टायझिंगकडे वळला. दोघंही हुशार होते. फक्त एकाने आयुष्याचं सोनं केलं, दुसऱ्याच्या आयुष्याची माती झाली. सुरुवाती–सुरुवातीस गाठीभेटी होत असत. एकमेकांच्या विवाहाच्या वेळी दोघंही मोकळेपणाने सर्व विधी–समारंभात सामील झाले होते... पण मग फिरोझची चलती होत गेली, आणि सदानंद होता तिथेच राहिला – मग तर आणखी खाली घसरला. आधीचे आलेख समांतर होते – मग फिरोझची रेषा वर चढत गेली होती – सदानंदची खाली वळली होती. दोघांच्यातलं अंतर आलेख दाखवत होता. लाक्षणिक तसंच व्यवहारातल्या अर्थानेही ते खरं होतं.

फिरोझला भेटण्यात आता सदानंदला संकोच वाटू लागला होता. संभाषणातले फिरोझचे संदर्भ समजेनासे झाले होते – होणारच ; कारण ते दोघं आता वेगवेगळ्या जगात वावरत होते... कॉलेजजीवनातल्या किंवा सुरूवाती–सुरूवातीच्या काळातल्या आठवणींची शिदोरी किती दिवस पुरणार ? फिरोझच्या सहवासात सदानंद अतिशय आक्रसल्यासारखा होई – पण फिरोझला तर त्याहून ऑक्‌वर्ड वाटत असे. – ''सदा, तुझं पोटेन्शिअल मला माहीत आहे !'' तो एकदाच म्हणाला होता, ''गेट युवरसेल्फ टुगेदर ! स्वत:ला सावर !'' आणि मग त्याने त्याच शब्दांबद्दल त्याची माफी मागितली होती, ''तुला शहाणपणा शिकवायचा मला काय अधिकार आहे ?'' तो म्हणाला होता.

भेटी–गाठीतलं अंतर वाढत वाढत शेवटी त्या पूर्णपणे थांबल्या होत्या.

त्याच फिरोझला सदानंदने पत्र लिहिलं होतं. अगतिक होऊन. प्रत्येक शब्दागणिक स्वत:चा द्वेष करीत. (पण फिरोझचा द्वेष करण्याचं, किंवा त्याचा रागराग करण्याचं सदानंदच्या स्वप्नातही आलं नव्हतं !)

त्यानं लिहिलं होतं –

''फिरोझ,

औपचारिकपणात वेळ घालवत नाही. मी सध्या नोकरीच्या शोधात आहे. तुझे खूप कॉन्टॅक्ट असतील. आता मी निवड करण्याच्या, अटी घालण्याच्या अवस्थेत नाही. अगदी साधी असली तरी चालेल. पण शहरापासून खूप लांबवरची पाहा – म्हणजे ओळखीचं कोणी भेटायला नको. मात्र एक लक्षात ठेव – काही रक्कम वगैरे पाठवण्याचा विचार मनात आला असला तर तो काढून टाक. चेक–ड्राफ्ट वगैरे पाठवलास तर मी तुला जन्मात क्षमा करणार नाही–'' (फिरोझच्या मनात खरोखरच पाच–सात हजार रुपयांचा ड्राफ्ट पाठविण्याचा विचार आला होता.)

सदानंद वाटलं होतं – पत्राच्या समर्थनासाठी आणखी काहीतरी लिहावं, पण मग त्याने तो विचार बदलला. त्याचा स्वभाव पुरेपूर ओळखणारा फिरोझ – त्याला सर्व काही समजेल. पत्नी आणि मुलं (एक का दोन ? तेही माहीत नव्हतं !) यांना औपचारिक नमस्कार, आशिर्वाद करीत त्याने पत्र संपवलं, आणि विचार बदलण्याचा आतच पोस्टात टाकलं.

आता त्याला आठवडा होत आला होता. गेले दोन–तीन दिवस सकाळच्या